मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. बालमालय शाखा.
अनुक्रम ११२८ नि
क्रमांक ३८८३ नोंद दि. १।१।७८

# देशद्रोह्यांना क्षमा नाही!

१५०७९
म. ग्रं. सं. ठाणे. बालमालय शाखा.
बा क्र. १५०७९ नों दि.
वि. बा. वा.
IRBK-0115079

लेखक
प्रा. रतनलाल डी. शहा एम्. ए.

वसुंधरा प्रकाशन सहकारी संस्था (म.) पुणे

किंमत अडीच रुपये

मित्रवर्य

श्री. हरिभाऊ एकबोटे

यांना–

प्रकाशक :

अनंत मो. पुराणिक,

वसुंधरा प्रकाशन

सहकारी संस्था (म.) पुणे करिता

१, ओंकारेश्वर कॉलनी,

पुणे–४११००९.

१ जुलै १९७३

© सुरक्षित

मुद्रक :

सौ. वसुधा रघुनाथ खरे

अक्षर मुद्रणालय,

४७ इंडस्ट्रियल इस्टेट,

लोणावळा (जि. पुणे)

मित्रवर्य

श्री. हरिभाऊ एकबोटे

यांना-

# हृद्गत्—

प्रथमपासूनच मी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेत आलो आहे. त्यामुळे बऱ्याच स्वातंत्र्यसैनिकांचे नि माझे निकटचे संबंध होते. त्यांनी केलेला त्याग आणि त्यांनी सोसलेले हाल मला ठाऊक असल्याने मी त्यांच्यावर बरेच लिखाण केले आहे. १९४२ च्या राष्ट्रीय आंदोलनात मी कारागृहवास भोगीत असता 'पेटती मशाल' ही कादंबरी आणि 'एक होता क्रांतिकारक' हे नाटक लिहिले. गोष्टी तर बऱ्याच लिहिल्या आहेत. त्यात असली क्रांतिकारकांबरोबर नकली क्रांतिवीरांची चित्रेही मी रेखाटली आहेत. पण स्वातंत्र्यानंतरच्या काळात बरेच स्वातंत्र्यसैनिक मागे पडलेले आणि हाल अपेष्टा भोगत असलेले मला जसे आढळले तसेच काही स्वार्थी बनून देशद्रोही कृत्ये करीत असलेले दिसून आले. ही गोष्ट मला खटकल्याने मी त्यावर कुमारांसाठी एक कादंबरी लिहिली. तीच ही !

या कादंबरीतील सर्व पात्रे आणि प्रसंग काल्पनिक आहेत. कुणाही व्यक्तीचा किंवा प्रसंगाचा नामनिर्देश करण्याचा माझा हेतू नाही.

रतनलाल डी. शहा
'सुदर्शन', सहकारनगर, पुणे ९
२६ जानेवारी १९७३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय
अनुक्रम ८११२४ वि. कादंबरी
क्रमांक ३५८३ नोंद दि. ११।१।८४

IRBK-0115079

अंधार मी म्हणत होता. थंडीही कडाक्याची पडली होती. तरी शेजारच्या बैठकीच्या खोलीतील घड्याळात ठणठण् असे पाच ठोके पडताच श्रीकांत अंगावरील रग बाजूला सारून चटकन् उठून बसला. नंतर उजव्या बाजूची खिडकी उघडून शेजारच्या घराकडे पहात त्यानें वरच्या आवाजात म्हटले, "पाच वाजले बरं का हमीद."

"अरे मी केव्हाच उठलो आहे." हमीदने त्याच्या घरातूनच पण स्वर चढवून सांगितले.

"मग ठीक आहे."

श्रीकांतनें प्रातर्विधी उरकले. थंड पाण्याने स्नानही केले. नंतर आपले केस विंचरून त्याने पांढरेशुभ्र परिट-घडीचे कपडे अंगावर चढविले. मग प्रसन्न मनानें तो बाहेर निघाला असता त्याच्या वडिलांच्या खोलीकडे त्याचे लक्ष गेले. ते पलंगावर तसेच पडून राहिलेले पाहून त्याने त्यांना सागितले, "साडेसहा वाजले बरं का

आबा."

"उठतो रे बाबा."

"आज स्वातंत्र्यदिन. तुम्हाला नाही का ध्वज-वंदनासाठी जायचं ?"

"जायचं आहे तर."

"आज गावात बऱ्याच ठिकाणी झेंडावंदनाचे कार्यक्रम आहेत. तुमच्या हस्ते कुठं नाही का ?"

"छे रे! आता आमची लोकांना कुठून आठवण यायला ? आज पुढं पुढं करणाऱ्या कार्यकर्त्यांना तो मान मिळायचा. आमच्यासारख्या स्वातंत्र्य सैनिकांना या जमान्यात कोण विचारतं बाबा ?"

"आमच्या शाळेत स्वातंत्र्य सैनिकांच्या हस्तेच झेंडावंदनाचा कार्यक्रम होणार आहे आबा."

"एक अपवादात्मक गोष्ट म्हणूनच याचा उल्लेख करावा लागेल."

"आजच्या लोकांनी तुमच्याकडे दुर्लक्ष केलं म्हणून मागं तुम्ही केलेल्या कार्याचं महत्त्व कमी होत नाही आबा. स्वातंत्र्याच्या इतिहासात तुमचा उल्लेख ठळकपणे केला जाईल." यावर श्रीकांतचे वडील मानाजीराव काही बोलले नाहीत आणि तो विषय तेथेच सोडून तो तेथून निघाला खरा पण त्याच्या वडिलांनी सांगितलेली गोष्ट त्याच्या मनाला खटकल्यावाचून राहिली नाही.

मानाजीरावांनी आपली सारी हयात त्यांच्या

मातृभूमीसाठी खर्ची घातली होती. हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा म्हणून केवढ्या खस्ता खाल्ल्या होत्या त्यांनी! खडतर कारागृहवास तर पाच वेळा पत्करला होता. त्यांच्या पाठीमागे हात धुऊन लागलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या त्रासाला त्यांना कितींदा तोंड द्यावे लागले होते याला तर गणतीच नव्हती. त्यांनी शारीरिक त्रासाबरोबर आर्थिक झीजही सोसली होती. त्यांची वडिलार्जित दौलत खूप असूनही त्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी त्याची पुरी वासलात लावली होती. त्यांच्या साऱ्या जमिनी तर विकल्या गेल्या होत्याच पण त्यांच्या पत्नीचे सारे दागिनेही सराफकट्ट्यावर गेले होते. नाही म्हणायला त्यांच्याजवळ राहिले होते काय तर त्यांचे वडिलार्जित दुमजली घर. खालच्या एका भागात राहून त्यांनी बाकीची जागा भाड्याने दिली होती. नाही म्हणायला मिळणाऱ्या भाड्याच्या तुटपुंज्या उत्पन्नावर ते आपल्या प्रपंचाचा भार थोडासा हलका करीत होते. त्यांची पत्नी प्राथमिक शाळेत शिक्षिका होती म्हणून बरे. नाही तर या महागाईच्या दिवसात त्या सातजणांच्या कुटुंबावर उपासमार होण्याची पाळी आली असती. भारताच्या स्वातंत्र्यासाठी मानाजीरावांनी घेतलेले कष्ट आणि केलेला त्याग पाहून श्रीकांतचे हृदय अगदी अभिमानाने फुलून जात असे इतकेच नव्हे तर अशा पित्याच्या पोटी जन्म घेतल्याबद्दल त्याला स्वतःची धन्यता वाटे.

श्रीकांत बैठकीच्या खोलीत आला. तेथील भिंती-वर मोठमोठ्या राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या तसबिरी टांगलेल्या होत्या. त्यानें त्यांना लवून अभिवादन केले. इतक्यातच पांढराशुभ्र पोशाख केलेला हमीद दरवाजात येऊन उभा राहिला. त्याच्या पायातल्या सॅण्डलस्‌चा आवाज ऐकून श्रीकांतने मान वळवून त्यांच्याकडे पहात त्याला विचा-रले, "आटपलं का तुझं ?"

"अरे केव्हाच !"

"मग चल तर."

श्रीकांत घराबाहेर पडला, तो हमीदबरोबर शाळेला निघाला. वाटेत हमीदनं श्रीकांतला सांगितले, "बरं का रे, साऱ्या रात्रीतून मला झोप अशी आली नाही. केव्हा एकदाचं उजाडतं आणि आजच्या पंधरा ऑगस्टच्या कार्यक्रमाला मी उपस्थित रहातो असं मला होऊन गेलं होतं."

"माझी झाली तरी तशीच अवस्था झाली होती बाबा. आजचा आपल्या स्वातंत्र्याचा सोहळा पाहण्या-साठी अधीर झालेलं माझं मन मला नीट झोप घेऊ देत नव्हतं."

"खरंच श्रीकांत, आपण स्वातंत्र्याप्रित्यर्थं काही केलेलं नसतानाही आजचा हा पंचविसावा वाढदिवस साजरा करतेवेळी आपल्याला किती आनंद होत आहे. मग प्रबळ अशा ब्रिटिश सत्तेशी दोन हात करून स्वातंत्र्य

मिळविलेल्या तुझ्या नि माझ्या वडिलांना किती आनंद होत असेल नाही?"

'त्याचा आनंद त्यांच्या अंगात मावत नसेल. प्रयत्नांची पराकाष्ठा करून त्यांनी मिळविलेल्या स्वातंत्र्याला आज पंचवीस वर्षे पूर्ण झालेली पहाण्याचं भाग्य लाभणं ही काय लहान सहान गोष्ट आहे?"

"खरं आहे तुझं म्हणणं."

"त्यांचा त्याग आणि त्यांचे श्रम सार्थकी लागलेले पाहून ते स्वत:ला धन्य समजत असतील नाही?"

"हो. खात्रीनं."

बोलत बोलत ते दोघे मित्र त्यांच्या शाळेजवळ आले होते.

त्यांची ती नेहमीचीच शाळा, पण त्यांना आता ती कशी अगदी वेगळी वाटत होती. स्वातंत्र्याचा वाढदिवस तिच्या अंगणात साजरा केला जाणार असल्याने तिला जणू काय अपरिमित आनंद झाला होता.

शाळेचे सारे आवार ध्वजपताकांनी कसे अगदी सुशोभित केले गेले होते. मधले प्रशस्त पटांगण स्वच्छ करून त्यावर पाण्याचा सडा शिंपडलेला होता. त्या ठिकाणी ध्वजवंदनाचा कार्यक्रम होणार असल्याने विद्यार्थी आणि विद्यार्थिनी तेथे जमू लागल्या होत्या. त्यांनी गणवेष घातला होता. मुलींनी केसात सुंदर नि सुवासिक फुले माळली होती. आणि सर्वजण आनंदाने व समाधानाने

तेथे वावरत होती, एकमेकांशी गोष्टी करीत होती. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी थोडावेळ आधीच सारा विद्यार्थीवर्ग तेथे जमला. शिक्षकही आले. सर्वजण त्यांना ठरवून दिलेल्या जागेवर जाऊन उभे राहिले. आणि अगदी वेळेवर मुख्याध्यापक सन्माननीय पाहुण्यांना घेऊन तेथे आले.

सर्वांच्या नजरा त्यांच्याकडे वळल्या.

त्यांचे ते कृश आणि जीर्ण शरीर पांढऱ्याशुभ्र खादीच्या कपड्याने झाकले गेले होते. त्यांच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडलेल्या होत्या तरी त्यांच्या डोळ्यांतील तेजस्वी छटा समोरच्या मुलामुलींच्या मनात त्यांच्याविषयी आदर निर्माण करायला पुरेशी होती. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात बजावलेल्या थोर कामगिरीची कल्पना त्यांच्या गुरुजींनी त्यांना आधीच करून दिलेली असल्याने त्यांना पाहण्याचे भाग्य आज लाभल्याबद्दल त्यांना समाधान वाटले. त्यांची मस्तके त्यांच्यापुढे विनम्र झाली.

तेथे अगदी नीरव शांतता पसरली त्या स्वातंत्र्यसैनिकाने झेंडा उभारला. नंतर मुख्याध्यापकांच्या विनंतीवरून ते धीरगंभीर आवाजात बोलू लागले.

“आध्यापक वर्ग आणि माझ्या विद्यार्थी मित्रांनो!

आपल्या आयुष्यातला हा फार मोठा भाग्याचा दिवस आहे, आपला भारत स्वतंत्र होऊन आज पंचवीस वर्षे पूर्ण झाली ही काय लहानसहान गोष्ट आहे? तुम्ही

मुलं स्वातंत्र्याच्या काळात जन्माला आलात.जेव्हा आपला हा देश पारतंत्र्यात होता तेव्हाच्या परिस्थितीची तुम्हाला कल्पना असणं शक्य नाही. दीडशे वर्षं पारतंत्र्यात खितपत पडलेल्या आपल्या हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कितीतरी लोकांनी बलिदान केले. त्या सर्वात ज्ञात अज्ञात देशभक्तांना अभिवादन करणं हे या मंगल दिवशी आपलं पवित्र कर्तव्य ठरतं.

आपल्याला एवढेच करून भागणार नाही. महत्प्रयासानं मिळालेलं स्वातंत्र्य टिकविण्याचं अवघड कार्य आपल्याला यापुढं कयराचं आहे. आणि त्याचा मोठा वाटा उसळत्या रक्ताच्या तुम्हा मुलांनाच उचलायचा आहे.

ध्यानात ठेवा. आपलं भलं झालेलं न पाहवणारे असे किती तरी देश या जगाच्या पाठीवर आहेत. त्यापैकी काही देश तर आपल्याहून प्रबळ आहेत. त्यांच्याजवळ अद्यावत् युद्ध सामुग्री असून आपल्यावर झडप घालण्यासाठी ते अगदी टपून बसले आहेत.

बरं का बाळांनो, आपल्या या खंड:प्राय देशात विविध जातीधर्मांची आणि वेगवेगळी भाषा बोलणारी माणसं आहेत. आपल्यावर राज्य करणारे ब्रिटिश आपल्या देशातून निघून जाताच एकमेकांशी आपण भांडणार आणि आपल्या देशाचे तुकडे पडणार असं पुष्कळांना वाटलं होतं. पण आपण आपली जबाबदारी ओळखून वागल्यामुळे त्यांची घोर निराशा झाली. आपण इतिहासा-

ची पुनरावृत्ती करून परस्परांच्या विरूद्ध शस्त्र उपसली नाहीत की एकमेकांचा काटा काढण्यासाठी परकियांना पाचारण केलं नाही. उलट अतिशय समजूतदारपणे वागलो. गेल्या पंचवीस वर्षात आपल्या देशाची आर्थिक घडी एकसारखी बिघडत जात आहे आणि आता तर महागाई पराकोटीला जाऊन पोहोचली आहे. लोकांच्या हालाला आता सीमा उरलेली नाही. माणूस माणसाला फाडून खातो की काय अशी अवस्था निर्माण झाली आहे. तरी आपण संयम सोडलेला नाही. आपलं मस्तक भडकू दिलेलं नाही. अविचाराचं कृत्य तर मुळीच केलेलं नाही. उलट आपल्यावर ज्या ज्या वेळी परकीय आक्रमणं झाली त्या त्या वेळी आपण सरकारच्या पाठीशी उभे राहिलो, एक कर्तव्याची भूमिका धारण करून ही नुसती कौतुकास्पदच नव्हे तर अभिमानास्पद गोष्ट आहे. राष्ट्राच्या स्वातंत्र्याला धोका निर्माण झाला असता आपण सर्वजण आपल्या अडचणी बाजूला सारून आणि आपले राजकीय मतभेद दूर करून एक दिलानं परचक्राला तोंड देऊ शकतो हे आपण आपले लचके तोडू पहाणाऱ्या आणि त्यांना सर्वतोपरी मदत करणाऱ्या देशांना दाखवून दिले आहे.

माझ्या बालमित्रांनो! हीच राष्ट्रीय वृत्ती तुम्ही धारण करा. तुम्ही स्वतः तर राष्ट्राला घातक ठरतील अशी कृत्यं करू नकाच. पण कुणी ती करीत असतील

तर त्यांची गयही करू नका. आपल्या देशाची सारी भिस्त तुमच्यावर आहे या गोष्टीचा तुम्ही कदापिही विसर पडू देऊ नका. जयहिंद."

या छोटया पण कळकळीच्या भाषणानें सर्व विद्यार्थी भारावून गेले. त्यांचे बोल श्रीकांत आणि हमीद यांच्या अंतःकरणाचा ठाव घेत गेले. ते स्वतः-शीच पुटपुटले, "आम्ही राष्ट्रद्रोही कृत्य करणार तर नाहीच पण ते कुणी करीत असलेले उघडया डोळयांनी पहाणार नाही."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अनुक्रम ११२२८ वि
क्रमांक ३८६३ नोंद दि २१।१।७४

## २

श्रीकांत हमीदबरोबर त्याच्या घरी आला तेव्हा त्या दोघांचे वडील त्यांच्या काही जुन्या सहकाऱ्यांबरोबर बाहेरच्या बैठकीच्या खोलीत गोष्टी करीत बसले होते. आज बऱ्याच दिवसांनी ते एकमेकांना भेटत होते म्हणून ते परस्परांशी खुलेपणाने बातचीत करीत होते. बोलण्यात अगदी रंगून गेल्यासारखे दिसत होते.

मानाजीराव तावातावाने म्हणाले, "मघाच्या समारंभाच्या वेळी केलेल्या भाषणात मंत्रिमहाशय आम्हाला देशभक्तीचे डोस पाजू लागले असता माझं रक्त कसं अगदी उसळ्या मारीत होतं. स्वातंत्र्यासाठी सारं आयुष्य खर्ची घातलेल्या आम्हा जुन्या कार्यकर्त्यांना देशासाठी काहीही न केलेल्या या गृहस्थानं उपदेश करावा हे खरोखरच आश्चर्य आहे."

"मला तर त्यावेळी त्या माणसाचा अतिशय राग आला होता." अहमदशेठ यांनी आपले विचार व्यक्त

केले. "पंचवीस वर्षापूर्वी आपण आपले प्राणपणाला लावून ब्रिटिश सत्तेशी झुंज देत असता हे महाभाग सरकारी वकील म्हणून काम करून स्वत:च्या तुंबड्या भरीत होते. सत्ताधारी लोकांनी आमच्यावर घातलेले खटले चालवून ते आम्हाला तुरुंगात लोटण्याचं पुण्यकृत्य करीत होते."

"आता झाली तरी त्यांच्यात काही राष्ट्रीयवृत्ती निर्माण झाली असेल असं मला वाटत नाही." बाबासाहेब केंजळ्यांनी आपले म्हणणे मांडले, "काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आल्यानं ते अंगावर खादीचे कपडे घालीत असले तरी त्यांची खादीवर निष्ठा आहे असं का समजता तुम्ही? ते त्यांच्या घरात वापरीत असलेले कपडे पहा म्हणजे तुम्हाला माझ्या म्हणण्याची खात्री पटेल."

"शिवाय त्याचं ते गर्हणीय चारित्र्य—त्यांच्याशी संबंध असणाऱ्या कितीतरी बायांची नावं ऐकायला मिळतात." भाऊराव गंध्यांनी म्हटले.

"हे महाभाग स्वत: यथेच्छ दारू पिऊन वर दारूबंदी उठवून लोकांचे संसार उध्वस्त करू पहात आहेत."

"अमेरिका आणि रशिया या सारख्या मोठमोठ्या राष्ट्रांना दारूचे दुष्परिणाम भेडसावीत असून त्यांच्या देशातील लोकांना मद्यपानापासून परावृत्त कसं करावं हा प्रश्न पडला असता, गांधी, टिळक आणि फुल्यांचे अनुयायी म्हणविणाऱ्या आमच्या पुढाऱ्यांना दारूबंदी उठवि-

ण्याची दुर्बुद्धी व्हावी, ही काही चांगली लक्षणं नाहीत."

"पैशाचं कारण पुढं करून ते आपल्या कृत्याचं समर्थन करू लागले म्हणजे हसू आल्यावाचून रहात नाही."

"मला तर त्यांची अतिशय चीड येते. पूर्वी कफल्लक असलेल्या या पुढाऱ्यांनी आता कित्येका लाखांची धनदौलत जमा केली आहे. खरंच, अशा दुर्वर्तनी लोकांच्या हाती आपल्या कल्याणकारी राज्याच्या कारभाराची सूत्रं जावीत आणि ती गरीबांचा कैवार घेणाऱ्या काँग्रेसनं घ्यावीत—अगदी शरमेची गोष्ट आहे ही नाही ?"

"अहो, असं आम्हाला वाटून काय उपयोग ? ज्यांच्या हाती आता काँग्रेसची सूत्रं गेली आहेत त्यांना तसं वाटायला पाहिजे ना ? इथून तिथून सारे स्वार्थी नि अप्पलपोटी. परवाच्या नगरपालिकेच्या अध्यक्षाच्या निवडणुकीच्या वेळी ते एकमेकांशी कसे लढले ते पाहिलंत ना तुम्ही ? त्यांच्यातील अंतर्गत लाथाळी अगदी चव्हाटयावर आली. पण त्या निगरगट्टांना त्याचं मुळीच काही वाटत नाही त्याबाबतीत कुणी त्यांना बोलू लागलं तर वरपासून खालपर्यंत सर्वत्र अशाच गोष्टी चालल्या असल्याचं ते निलाजरेपणानं सांगतात."

"आणि आमच्यासारखे जुने कार्यकर्ते त्यांना चार समजुतीच्या गोष्टी सांगू लागले तर ते तुच्छतेनं हसतात आणि 'तुमचे दिवस आता संपले आहेत' म्हणून सरळ

सांगतात." आणि आपल्याला ते निमूटपणे ऐकून घ्यावे लागते.

"करायचं काय ? आपला बहुजनसमाज अशिक्षित पडला. जे काही शिक्षित आहेत त्यातले फार थोडे सुशिक्षित आहेत. बहुतेक सारेजण स्वार्थाच्या मागे लागले असून उगवत्या सूर्याला नमस्कार करणारे आहेत मग ते आमच्यासारख्या जुन्या आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांच्याकडे पाठ फिरवून सत्ताधाऱ्यांच्या मागे लागले नाहीत तरच नवल."

आमच्या डोळ्यांदेखत अशा गोष्टी घडाव्यात ? आपल्या त्यागाला हे फळ आलेलं पाहून माझा आता सत्य आणि अहिंसेवरचा विश्वास उडत चालला आहे. ध्येयाच्या मागे लागून आपण हाल अपेष्टांचं जिणं जगायचं सोडून दिलं पाहिजे असं मला आताशा वाटू लागलं आहे. याहीपुढं जाऊन सांगायचं म्हणजे आपण राज्यकर्त्यांच्या पावलावर पाऊल टाकून हव्या त्या मार्गानं पैसा मिळवायला काही हरकत नाही, असं मला वाटू लागलं आहे." मानाजीरावांनी आपल्या मनातले बोल बोलून टाकले.

"छे ! छे ! मानाजीराव, काय बोलताहात तुम्ही हे ?" भाऊराव गंध्यांनी थोडेसे गोरेमोरे होऊन विचारलें. "कुठल्याही परिस्थितीत आपण आपल्या ध्येयनिष्ठ जीवनाला बाध येईल असं वागता कामा नये. मग आमच्यात आणि आत्ताच्या संधीसाधू कार्यकर्त्यांत फरक

तो काय राहिला ?"

यावर मानाजीराव काही बोलण्यापूर्वी अहमदशेठ यांनी त्यांची बाजू घेऊन म्हटले, "मी मानाजीरावांच्या मताशी पूर्णपणे सहमत आहे भाऊराव. इतके दिवस आपण ध्येयाच्या मागं लागून आपलं सारं आयुष्य बरबाद करून घेतलं ते पुष्कळ झालं. कालमान ओळखून आपण ज्यामुळं आपला फायदा होईल अशा गोष्टी आता करायला पाहि-जेत." इतक्यात बाहेरून काही मंडळी मानाजीरावांच्या-कडे आल्यामुळे बोलण्याचे थांबवून त्यांना त्यांच्याकडे वळावे लागले.आलेली कार्यकर्ती मंडळी तेथून बाहेर पडली.

हमीदही त्याच्या घराकडे जायला निघाला. पण जाण्यापूर्वी त्याने श्रीकांतला म्हटले, "ऐकलसं ना तू मगाचं बोलणं ? स्वातंत्र्य सैनिकांना चालू राज्यकारभारात काही स्थान राहिलेलं नाही. आणि जे सत्ता बळकावून बसले आहेत त्यांची आणि चारित्र्याची पूर्ण फारकत झालेली आहे."

"खरं सांगायचं म्हणजे असा प्रकार इतर देशातही आढळतो. आपल्याबरोबर स्वतंत्र झालेल्या पाकिस्तानकडे पहा ना ! सत्ताधारी लोकांत स्वातंत्र्य सैनिक आढळतात का तिथं ? अब्दुल गफारखानासारखे थोर स्वातंत्र्ययोद्धे एका बाजूला पडले आहेत. तर भुत्तोसारखे एकेकाळचे सनदी नोकर सर्व सत्ता बळकावून बसले आहेत."

"या गोष्टीमुळे स्वातंत्र्य सैनिकांची मनं दुखावली

जात नसतील का ?"

"त्यांची मनं दुखावली जात असतीलही कदाचित. पण त्यांनी ती गोष्ट मनाला लावून घेऊन आपली पाऊलं वाईट दिशेनं मात्र टाकता कामा नये. राज्यकर्ते दुराचारी जीवन जगत असले म्हणून यांनीही तसलं जीवन जगावं असं थोडंच आहे ? उलट आपल्या वडिलकीच्या नात्याचा उपयोग करून त्यांनी मिळेल ती संधी साधून राज्यकर्त्यांच्या चुका त्यांच्या नजरेला आणल्या पाहिजेत. त्यांची भलत्या मार्गानं जाणारी गाडी सरळ मार्गावर आणून सोडली पाहिजे."

"त्यात त्यांच्या हातांना यश लाभेल असं का तुला वाटतं ?"

"अशक्य असं काहीच नाही बाबा. पण प्रयत्न मात्र योग्य दिशेनं आणि चिकाटीनं झाले पाहिजेत. म्हणून मी म्हणतो की स्वातंत्र्य सैनिकांनी दुराचारी लोकांच्या हाती सत्ता गेलेली पाहून हताश न होता ज्या तऱ्हेनं ब्रिटिशांना आपल्या देशातून हाकलून लावलं त्याच पद्धतीचा अवलंब करून त्यांना बाजूला सारायचा प्रयत्न केला पाहिजे."

# ३

श्रीकांतला एका गोष्टीचं राहून राहून आश्चर्य वाटत होतं. त्याच्या घरची परिस्थिती यथातथाच असून नि त्याच्या खर्चाची तोंडमिळवणी करता करता त्याच्या आईवडिलांच्या नाकी नऊ येत होते. तरी गेल्या काही दिवसात त्याच्या घरी आबादीआबाद दिसत होती. सोफासेट आला होता. रेडिओ दिसू लागला होता. इतकेच नव्हे तर त्याच्या वडिलांच्या मनगटावर भारी किमतीचे घड्याळ शोभत होते. एखादी जादुची कांडी फिरविल्याप्रमाणे घरची आर्थिक परिस्थिती एकदम सुधारलेली पाहून त्याने त्याच्या आईला विचारले, "काय गं आई, गेल्या काही दिवसात आपल्या घरी बरंच नवीन सामान आलं आहे. ते खरेदी करायला कुठून आला पैसा ?"

"काय करायचं आहे तुला ते ऐकून ? तू तुझा अभ्यास कर म्हणजे झालं."

"मी माझा अभ्यास तर करतोच आहे. पण त्या-बरोबर मी थोडंसं घरच्या गोष्टीत लक्ष घातलं तर?"

आम्ही जिवंत असताना तुला घरच्या गोष्टीत लक्ष घालायची मुळीच जरुरी नाही."

"असं कसं म्हणतेस तू आई? या घरचा एक घटक या नात्यानं घरच्या अडिअडचणींकडे मी जसं लक्ष द्यायला हवं तसं घरात आबादीआबाद दिसली असता त्याचं कारण जाणून घ्यायला मला हवचं."

"त्याची काही जरुरी नाही."

"पण आई..."

"आता तू या विषयावरचं बोलणं बंद करशील का श्री? भलत्या चांभारचौकशा करायची सवयच आहे बघ तुला."

आईनं असे खडसाविले असता श्रीकांतचे तोंड बंद झाले. तरी त्याच्या डोक्यातला तो विचार नाहीसा होत नव्हता. म्हणून त्यानें एकदा संधी साधून तो विषय आपल्या वडिलांजवळ काढला. तेही थोड्याशा तीव्र शब्दात त्याला म्हणाले, "असल्या अवांतर गोष्टीकडे लक्ष देण्यापेक्षा तू मन लावून अभ्यास कर. परीक्षेत वरचा क्रमांक मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्नाला लाग–"

"अभ्यासात मी कधी कसूर केली आहे का आबा? पण अभ्यास नीट करून मी घरच्या गोष्टीत थोडसं लक्ष घातलं तर..."

"काही जरुरी नाही त्याची."

वडिलांनीही श्रीकांतास धुडकावून लावले असता त्याच्या मस्तकातल्या वादळाने उग्र रूप धारण केले. अशात वरच्या मजल्यावरच्या चांगल्या भाडेकरूला काढून ती चार खणांची जागा मानाजीरावांनी आपल्या ताब्यात घेतली असता तर त्याचे मन अधिकच चलबिचल बनले. त्याला वाटले–

"आबांना द्रव्योपार्जनाचं एखादं नवीन साधन उपलब्ध झालं आहे खास. गोष्ट चांगली आहे. पण ते ती गोष्ट माझ्यापासून चोरून का ठेवताहेत? मी इतका जीव तोडून विचारीत असता ते मला धुडकावून का लावताहेत?" त्याला काही त्या प्रश्नाचे उत्तर सापडेना.

शेवटी न राहवून त्याने आपला विचार हमीदपुढे मांडला असता त्याने त्याला सांगितले, "गेले काही दिवस माझ्या मनात झाले तरी तुझ्याप्रमाणेच विचार घोळताहेत श्री."

"म्हणजे?"

आमच्या हलाखीच्या परिस्थितीची आहेच तुला कल्पना. माझ्या वडिलांच्या फ्रेममेकरच्या छोटयाशा दुकानावर आमच्या कुटुंबाच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटणं कालत्रयी शक्य नव्हतं. त्यामुळे आब्बाजानना बरंच देणं झालं होतं. सकाळी उठल्याबरोबर एखाद्या देणेकऱ्यानं आपलं तोंड आम्हाला दाखविलं नाही असं सहसा कधी

झालंच नाही. पण अलीकडे त्यांचं येणं थांबलं आहे. मी त्याबद्दल माझ्या आईजवळ चौकशी केली असता माझ्या वडिलांनी सर्वांची देणी भागविल्याचं तिनं मला सांगितलं. इतकंच नव्हे तर तिनं मला लौकरच सायकल घेऊन द्यायचं कबूल केलं आहे."

"खरं की काय?"

"हो."

त्यासाठी लागणाऱ्या पैशांची सोय कशी करणार आहेत तुझे वडील?"

"मी त्याबाबतीत त्यांच्याजवळ चौकशी केली असता त्यांनी मला चक्क सुनावलं, "माझे व्यवहार पहाण्याइतका तू अजून मोठा झाला नाहीस. तुझं हे अभ्यास करायचं वय आहे. तू मन लावून अभ्यास कर."

"यावर तू काय बोलणार कपाळ?"

"माझं तोंड बंद झालं तरी डोळे उघडे असल्यानं गेले काही दिवस एक गोष्ट एकसारखी माझ्या नजरेला येते आहे."

"ती कोणती?"

"रात्री सर्वत्र सामसूम झाल्यावर माझ्या वडिलांकडे काही अपरिचित लोक येतात. त्यांना घेऊन ते बराच वेळ बसतात. त्यावेळी ते खोलीचं दार बंद करून घ्यायला विसरत नाहीत...."

"खरं की काय?"

होकारार्थी मान हलवून हमीदने सांगितले, "पुढं काय होतं ते ठाऊक आहे का तुला?"

"सांग, पुढं काय होतं?"

"त्यांच्या खालच्या आवाजात बराच वेळ काही गोष्टी झाल्यावर आलेल्या लोकांना घेऊन माझे वडील घराबाहेर पडतात आणि तुमच्या घरी जातात."

"काय? माझ्या घरी ?"

"हो."

"इतक्या दिवसात माझ्या नजरेला कशी काय आली नाही ती गोष्ट?"

"रात्री तू तुझ्या खोलीत झोपलेला असल्यावर सर्वजण वरच्या माडीवर गेलेले तुला कसे काय कळणार?"

"असं म्हणतोस?"

"नाही तर काय?"

"त्या लोकांबरोबर माझे वडील आमच्या माडीवर काय बरं करीत असतील?"

"मला आता तरी तोच प्रश्न पडला आहे."

"त्यांची तिथं काहीतरी महत्त्वाची खलबतं होत असली पाहिजेत हे नक्की. तेवढ्याचसाठी माझ्या वडिलांनी माडीवरचं बिऱ्हाड हलविलं असलं पाहिजे."

"मलाही तसंच वाटतं."

"बरं का रे हमीद, हे लोक आमच्या माडीवर बसून काय करतात ते आपण पाहिलंच पाहिजे."

"पण ते कसं काय शक्य आहे?"

"मनात आणल्यावर सारं काही शक्य होतं."

"पण ते कसं हे सांगशील की नाही?"

"सांगतो. कान इकडे कर. भिंतींना देखील कान असतात हे तू विसरू नकोस."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम ५१२४ वि.
क्रमांक ३८६३ नोंद दि. ११।१।७४

## ४

रात्रीचे जेवण झाल्यावर हमीदने त्याच्या आईला सांगितले, "बरं का अम्माजान, मी थोडासा श्रीकांतकडे जाऊन येतो."

"एवढ्या रात्री ?"

"हो. गुरुजींनी चार गृहपाठ लिहून आणायला सांगितले आहेत. थोडेसे अवघड आहेत ते तेव्हा आम्ही ते मिळूनच लिहायचं ठरविलं आहे."

"तर मग तू जा."

दोन वह्या हाती घेऊन हमीद घराबाहेर पडला. तो श्रीकांतकडे गेला असता त्याने त्याच्या वडिलांना सांगितले, "मी थोडासा हमीदकडे जाऊन येतो."

"कशाला रे ?"

"हमीदनं त्याच्या एका ओळखीच्या मुलाकडून काही परीक्षेचे पेपर मिळविले आहेत. ते सोडविणार आहोत आम्ही."

"एवढ्या रात्री?"

"पेपर सकाळीच परत करायचे असल्याने ते रात्रीतूनच सोडवायला पाहिजेत."

"तर मग जा."

दोन वह्या हाती घेऊन श्रीकांत हमीदसह घराबाहेर पडला

वरचे जिन्याचे दार पुढे लोटलेले होते. तिकडे पहाताच दोघे रस्त्यावर आले. एकदा चौफेर नजर फिरवून श्रीकांतने हळूच दार उघडले. त्यातून ते दोघेही आत गेल्यावर श्रीकांतने चटकन् दार आत ओढून घेतले.

नंतर ते पावलांचा आवाज न करता जिना चढून मोठ्या खोलीत आले असता हमीदने श्रीकांतला विचारले,

"आता काय करायचं रे?"

"वरच्या माळ्यावर जाऊन बसायचं."

"आपण कुणाच्या नजरेला पडलो तर?"

"वर थोड्याशा मागच्या बाजूला जाऊन बसल्यावर इथल्या कुणाला दिसायचो नाही पण इथं बसलेली मंडळी मात्र आपल्याला दिसतील. त्यांचं बोलणं आपल्याला ऐकता येईल."

"मग चल तर."

दोघेही वरच्या माळ्यावर चढले आणि सोयीची एक जागा पाहून अंग चोरून बसले. त्यांना तेथे येणाऱ्या मंडळीची वाट पहात फार वेळ बसून रहावे लागले. चांगला

दीड तास लोटल्यावर मानाजीराव आणि अहमदशेठ दोघा अपरिचित इसमांना घेऊन तेथे आले.

त्यांनी लगेच बाहेरचे दार आतून बंद करून घेतले. खिडक्यांची दारे बंद असल्याचीही त्यांनी खात्री करून घेतली. नंतर डाव्या बाजूच्या भिंतीला लागून असलेल्या मोठाल्या लाकडी बाकावर बसून ते खालच्या आवाजात गोष्टी करू लागले.माळ्यावर बसलेली मुले कान टवकारून त्यांची बोलणी ऐकू लागली. बोलायला सुरवात दोघा अपरिचित लोकांपैकी एकाने केली. त्याने त्याच्या शेजारी बसलेल्या मानाजीरावांना विचारले, "तुम्ही मला कोयना धरणाचे नकाशे मिळवून देणार होता त्याचं काय झालं?"

"त्याच प्रयत्नात आहे मी ?"

"आज मिळणार होते ना ते?

"तिथल्या एका अधिकाऱ्यानं ते मला आज द्यायचं कबूल केलं होतं. त्यासाठी मी त्याला तीन हजार रुपयेही दिले होते–"

"मग काय झालं ?"

"त्याच्या वरिष्ठाची नजर चुकवून आज काही त्याला ते मिळविता आले नाहीत. पण ते सोमवारपर्यंत निश्चितपणे आपल्या हाती पडतील असं वाटतं."

"नक्की ना हे ?"

"अगदी नक्की."

"आणि आम्हाला हव्या असलेल्या दारुगोळा कार-

खान्याच्या नकाशाचं काय झालं ?"

"तेही मला सोमवारपर्यंत मिळतील."

"ते जितक्या लौकर मिळविता येतील तितक्या लौकर मिळवा. माझ्या वरिष्ठाकडून त्याबाबतीत माझ्याकडं सारखी विचारणा होते आहे. मला ते लौकर त्यांच्याकडे पाठवायला हवेत. तेव्हा काहीही करून ते सोमवारी मिळवाच."

"ठीक आहे." म्हणून मानाजीरावांनी सांगितले, "त्यासाठी मी त्या अधिकाऱ्याला पाच हजार रुपये द्यायचे कबूल केले आहे."

"तुम्ही त्याला पाच हजारच काय पण दहा हजार रुपये द्या पण सोमवारपर्यंत सारे नकाशे आपल्या पदरी पाडून घ्या." म्हणून त्या पाहुण्यानें विचारलें, "तुम्हालाही काही रक्कम हवी असेल."

"हो."

"मग हे घ्या पंधरा हजार रुपये." म्हणून त्या इसमाने आतल्या खिशातून एक नोटांचे पुडके बाहेर काढून मानाजीरावांच्या स्वाधीन केले. लगेच त्यांनी ते आपल्या जाकिटाच्या आतल्या खिशात ठेवून दिले.

"आणखी काही?"

"काही नाही."

आता दुसऱ्या पाहुण्याने त्याला लागून बसलेल्या अहमदशेठना विचारले, "पाकिस्तानच्या येत्या कारवाई-

च्यावेळी आम्हाला मदत करणाऱ्या लोकांची नावं तुम्ही मला देणार होता. त्याचं काय झालं ?"

"त्याच प्रयत्नात आहे मी. म्हणून अहंमदशेठ यांनी खुलासा केला, "मी येथील काही मुस्लीम बंधूंना आणि कम्युनिस्ट मित्रांना भेटलो. त्यांना आपण पैसे चारले तर ते आपल्याला हवी ती मदत करायला तयार आहेत."

"त्या लोकांची एक यादी करून ठेवा तुम्ही."

"ठीक आहे."

"त्यांच्या नावाबरोबर त्यांचे पत्तेही असू देत."

"तेही मी देईन."

"आपल्या म्हणण्याप्रमाणे ते घातपाती कृत्यं करायला तयार होतील म्हणता ?"

"खात्रीनं" म्हणून अहंमदशेठ यांनी सांगितले, "पण आपल्याला त्यांचे खिसे मात्र गरम करायला हवेत."

"तें आम्ही करू हो !" म्हणून खिशातून एक नोटांचे पुटके काढून ते अहंमदशेठ यांच्या स्वाधीन करीत त्या माणसाने सांगितले, "तूर्त हे दहा हजार रुपये राहू देत तुमच्याजवळ." अहंमदशेठ यांनी मुकाट्याने ते पुडके घेऊन त्यांच्या शेरवानिच्या खिशात ठेवले.

"संपलं ना आमचं काम ?"

"हो."

"मग ऊठू आम्ही ?"

"हो. चला की."

सर्वजण उठले अहमदशेठ पुढे झाले. त्यांच्यामागून ते दोघे पाकिस्तानी गुप्तहेर चालले. सर्वांच्या शेवटी मानाजीराव निघाले.

हळुहळू जिना उतरून खाली आल्यावर अहमदशेठ यांनी हळूच दाराची कडी काढली. थोडेसे दार उघडून त्यांनी चौफेर नजर फिरवली तेथे कोणी फिरकत नसलेले पाहून समाधानाने ते त्यांच्या मागे उभ्या असलेल्या पाहुण्यांना म्हणाले, "चला साहेब." ते दोघेजण झटकन् बाहेर पडले. ते नजरेआड झाल्यावर अहमदशेठ त्यांच्या घराकडे निघाले. नंतर मानाजीराव जिन्याचे दार आतून बंद करून घेत असता जिन्यावर पाऊले वाजू लागल्याने त्यांनी चमकून मागे वळून पाहिले असता श्रीकांत आणि हमीद जिना उतरून खाली येत असलेले त्यांना दिसले. तेव्हा गोंधळून जाऊन ते उद्गारले, 'कोण ? तुम्ही?" यावर मुले काही बोलली नाहीत.

"माडीवर केव्हा गेलात तुम्ही?"

"तुम्ही माडीवर येण्यापूर्वी थोडावेळ आधी."

"इतका वेळ कुठं होता तुम्ही ?"

"वरच्या माळ्यावर."

"माळ्यावर काय करीत होता तुम्ही ?"

"तुमच्या त्या पाकिस्तानी पाहुण्यांबरोबर चाल-लेल्या गोष्टी ऐकत होतो."

"श्री !"

"होय आबा; तुम्ही वर काय करता ते पहाण्यासाठी आम्ही तुम्हाला कळू न देता माळच्यावर जाऊन बसलो होतो." म्हणून उद्गारून श्रीकांतनें हमीदला सांगितले, "जा तू आता." काही न बोलता हमीद दारातून बाहेर पडून त्याच्या घराकडे वळला असता श्रीकांतने त्याच्या वडिलांना म्हटले, "आबा! आबा! काय करताहात तुम्ही हे? एक थोर स्वातंत्र्य सैनिक म्हणून मी तुमच्याकडे पहात होतो. तुम्ही वैऱ्यांचे हस्तक निघावेत..."

"मी अलीकडेच हे काम पत्करलं आहे."

"पण ते का?"

"त्याला दोन कारणं आहेत. आताशा शीलाची चाड बाळगणारं असं कुणी राहिलं नाही. मोठमोठाले पुढारी देखील हव्या त्या मार्गाचा अवलंब करून पैसे मिळवू लागले आहेत."

"म्हणून तुम्ही हा मार्ग पत्करलात?"

"त्याला आणखी एक कारण आहे."

"ते कोणतं?"

"आपला प्रपंच मोठा तर आपली परिस्थिती हलाखीची. त्यातून महागाई वाढत असलेली आणि आपली ओढाताण होत असलेली. अशात मी देशासाठी सर्वस्वाला मुकून दारिद्र्याचं जिणं पत्करलं तरी सर्वांनी आमच्या-

कडे पाठ फिरविलेली. सत्ताधारी लोकांनी तर आम्हाला बाजूलाच सारलेलं. तेव्हा आयती चालून आलेली संधी साधून चार पैसे मिळवावे असं मला वाटलं ..."

"अरेरे! काय सांगताहात तुम्ही हे आबा! पारतंत्र्याचा जू झुगारून देण्यासाठी प्राण पणाला लावून लढलेले तुम्ही थोर सैनिक, महत्प्रयासानं मिळविलेल्या स्वातंत्र्याच्या नरडीला नख लावण्यास उठलेल्या वैऱ्यांना फितूर व्हावं ..."

"त्यामुळेच आपलं भलं होणार आहे श्री."

"पण ..."

"आता थांबवतोस का तू हा विषय! आपलं बोलणं कुणी ऐकलं तर एक करायला जाऊ अन् एक होऊन बसायचं." म्हणून सांगून मानाजीराव जिन्याचे दार आतून बंद करून घेऊन त्यांच्या झोपण्याच्या खोलीकडे वळले. आणि श्रीकांत? वृत्ती बधीर झाल्याप्रमाणे तो त्याच्या वडिलांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात राहिला.

हमीद चालला होता खरा. पण त्याची पाऊले कशी अगदी जड पडत होती. त्याचे डोळे तीव्र बनून त्याच्या मस्तकावर घणाचे घाव बसल्यासारखे होत होते शेवटी मनाचा हिय्या करून तो त्याच्या घरात शिरला असता बैठकीच्या खोलीत लोडाला टेकून बसून विडी ओढणाऱ्या त्याच्या वडिलांनी त्याला विचारले, "झाले का रे गृहपाठ लिहून?"

हमीदनें नकारार्थी मान हलविली.

“नाही? मग श्रीकडे इतका वेळ काय करीत होतास तू?”

“मी आणि श्री त्याच्या माडीवरच्या माळ्यावर जाऊन बसलो होतो.”

“माडीवरच्या माळ्यावर? आणि ते कशासाठी?”

“त्या पाकिस्तानी गुप्तहेरांबरोबर तुम्ही खालच्या खोलीत काय करता ते पहाण्यासाठी.”

“आम्ही त्यांना घेऊन मानाजीरावांच्या माडीवर येणार असल्याचं कसं काय कळलं तुम्हाला?”

“आपलं कळलं असंच.” हमीदने सांगितले. “तुमचं त्या पाकिस्तानी हेरांबरोबरचं बोलणं तर आम्हाला ऐकायला मिळालंच पण तुम्ही त्यांच्याकडून घेतलेलं नोटांचं पुडकंही पहायला मिळालं.”

“अरे! अरे! किती मोठ्यांदा बोलतोस तू!”

“तुम्ही असे असाल असं वाटलं नव्हतं मला अब्बाजान.”

पण यावर काही न बोलता अहमदशेठ गप्प राहिले असता हमीदने त्यांना विचारले, “तुम्ही स्वत:ला स्वातंत्र्य सैनिक म्हणविता आणि वैऱ्याला मदत करता?”

“वैरी? कोण वैरी? पाकिस्तान का आपला वैरी आहे?”

“मग नाही का?”

"मुळीच नाही– पाकिस्तान आपलं राष्ट्र असून त्याला सर्वतोपरी मदत करणं आपलं परमपवित्र कर्तव्य आहे."

"अब्बाजान! अब्बाजान! तुम्हीच बोलता आहात का हे?"

"हो. मीच बोलतो आहे हे. आणि तू झालं तरी माझं म्हणणं मान्य करून माझ्या सांगण्याप्रमाणं वागलं पाहिजे. अरे बाबा, किती झालं तरी पाकिस्तान हें एक मुस्लीम राष्ट्र आहे. आणि त्याच्या भल्यासाठी झटणं मुस्लीम म्हणून आपलं थोर कर्तव्य आहे."

"आणि आपलं आपल्या देशाविषयीचं काही कर्तव्य नाही का ?"

"नाही, मुळीच नाही!"

"आपण भारताचे नागरिक आहोत अब्बाजान."

"तरीही आजचा भारत उद्याच्या पाकिस्तानचा भाग कसा बनेल इकडं आपण लक्ष द्यायला पाहिजे."

"नाही. कालत्रयी शक्य नाही ते"

"मुस्लीम राष्ट्रांच्या आणि चीन अमेरिकेच्या मदतीवर पाकिस्ताननं लौकरच ते शक्य करून दाखविलेलं तुला दिसेल."

"भ्रमात आहात तुम्ही अब्बाजान"

"मी भ्रमात आहे की तू भ्रमात आहेस ते लौकरच दिसेल तुला. घोडा मैदान अगदी जवळ आहे."

"पण अब्बाजान...."

"आता यावर अधिक न बोलता स्वस्थ झोप जा पाहू."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय
अनुक्रम ......... दि.........
क्रमांक ......... नोंद दि.........

श्रीकांत आणि हमीद शाळेला निघाले होते. खरे पण ते एकमेकांकडे पहात देखील नव्हते. मग ते परस्परांशी हसून खिदळून बोलायची गोष्ट दूरच राहिली. दोघांचेही चेहरे अतिशय गंभीर बनले होते आणि त्यांच्या मस्तकात विचारांनी मारे थैमान घातले होते.

शेवटी या स्तब्धतेचा भंग करून श्रीकांतने हमीदला विचारले, "आता काय करायचं रे आपण?"

"माझं डोकं कसं अगदी बधीर झाल्याप्रमाणं झालं आहे. काही म्हटल्या काही सुचत नाही मला. तेव्हा तूच सांग, काय करायचं आपण."

"आपण कितीही कळकळीनं सांगितलं तरी त्याचा आपल्या वडिलांच्या मनावर काहीही परिणाम होत नाही."

"खरं आहे ते."

"मग काय, त्यांच्यापुढं आपलं काही चालत नाही

असं कल्पून मूग गिळून स्वस्थ बसायचं का आपण?"

"आपल्याला स्वस्थ बसून कसं चालेल? असं केल्यानं आपण आपल्या देशाविषयीच्या कर्तव्याला चुकल्यासारखं होणार नाही का?"

"हो. होईल तर."

"मग आपण हा प्रश्न कसा सोडवावा?"

"आपण यावर आज विचार करू आणि उद्या काय करायचं ते ठरवू."

"ठीक आहे."

दोघेही शाळेत आले. वर्गात येऊन ते नेहमीप्रमाणे पुढच्या एका बाकांवर शेजारीशेजारी बसले.

त्यांच्याबरोबर बोलणाऱ्या मुलांशी ते बोलत होते तरी त्यांचे तिकडे फारसे लक्ष नव्हते. त्यांच्या मस्तकात सारे विचार चालले होते. त्यांच्या वडिलांबद्दल. त्यांना त्यांच्या राष्ट्रद्रोही कृत्यापासून परावृत्त कसे करावे याबद्दल.

अशातच घंटा झाली. मराठीचे गुरुजी वर्गात आले. सर्व मुलांचे लक्ष त्यांच्याकडे वळले असता त्यांनी त्यांना सांगितले, "आज निबंध लिहायचा आहे तुम्हाला. निबंधाचा विषय आहे विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय कर्तव्य."

"विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय कर्तव्य." म्हणताच श्रीकांत आणि हमीद एकदम चमकले आणि नकळत त्यांच्या मुखातून उद्‌गार बाहेर पडले, "काय! विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय

कर्तव्य!" "होय विद्यार्थ्यांचं राष्ट्रीय कर्तव्य." म्हणून सांगून गुरुजींनी खुलासा केला, "आपण स्वातंत्र्यदिन नुकताच साजरा केला आहे. तुम्ही त्या दिवशी झेंडावंदनाच्या वेळी झालेल्या थोर स्वातंत्र्यसैनिकांचं भाषणही ऐकलं आहे. ते तुमच्या आठवणीत आहे असं मी समजतो."

"आहे सर." सर्व विद्यार्थ्यांनी एका सुरात सांगितले.

"त्या दिवशी तुम्ही इतर पुढाऱ्यांचीही भाषणं ऐकली असतील पंचविसाव्या स्वातंत्र्य दिनावर बहुतेक साऱ्या वर्तमानपत्रांनी लेख लिहिले आहेत. तेही तुम्ही वाचले असतील..."

"हो सर."

"छान! उत्तम!" म्हणून उद्गारून गुरुजी म्हणाले, "आपल्या देशाच्या इतिहासाची पानं चाळली तर देशासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या, इतकंच नव्हे तर प्राणार्पण करणाऱ्या थोर स्त्रीपुरुषांची चरित्रं आपल्याला पदोपदी आढळतील. राष्ट्राच्या हितावर नजर ठेवून पत्नी पतीच्या आणि मुलगा बापाच्या विरुद्ध जाऊन बंड पुकारल्याचं तुम्हाला दिसून येईल."

"खरं आहे सर."

सर्व मुलांनी एका सुरात सांगितले. नाही बोलले काय ते श्रीकांत आणि हमीद. त्यांची छाती धडधडत होती तर त्यांचा श्वास जोराने वहात होता. त्यांच्याकडे कोणा-

चेच लक्ष नव्हते म्हणून बरे.नाहीतर त्यांचे ते पडलेले चेहरे पाहून त्यांना आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नसते.

अशातच गुरुजी म्हणाले, "राष्ट्रासाठी पतिपत्नीत, भावाभावात आणि पितापुत्रात संघर्ष निर्माण झाल्याची उदाहरणे तुम्ही तुमच्या डोळ्यापुढे ठेवून निबंध लिहायला लागा." मुलांनी गुरुजींची आज्ञा पाळली. त्यांनी आपल्या निबंधाच्या वह्या उघडून त्यात तो लिहायला सुरुवात केला. नाही म्हणायला समोर वही ठेवून आणि हातात पेन घेऊन विचार करीत बसून राहिले होते काय ते श्रीकांत आणि हमीद. ही गोष्ट गुरुजींच्या लक्षात आल्याने त्यांनी त्यांना विचारले, "काय रे, तुम्ही का असे स्वस्थ बसून राहिला आहात?"

"आम्ही..." पण पुढचे शब्द त्यांच्या मुखातून बाहेर पडेनात.

"बरे नाही का वाटत तुम्हाला?" दोघांच्याही उतरलेल्या चेहऱ्याकडे लक्ष गेल्याने गुरुजींनी विचारले.

"होय सर." काहीतरी सांगायचे म्हणून श्रीकांत आणि हमीद यांनी सांगितले.

"काय होतंय तुम्हाला? डोकं का दुखत आहे!"

"होय सर. डोक्यावर घणाचे घाव बसल्यासारखे होताहेत."

"मग जा तुम्ही घरी. तुम्ही निबंध घरून लिहून आणला तरी चालेल."

"थँक्स सर."

श्रीकांत आणि हमीद उठले. आपल्या पिशव्या घेऊन ते वर्गाबाहेर पडले. पण सरळ घराचा रस्ता न धरता ते पलीकडच्या आंब्याच्या झाडाखाली जाऊन बसले. विचार, एकसारखा विचार करीत होते ते.

थोड्या वेळाने या स्तब्धतेचा भंग करून हमीदने विचारले, "काय करायचं? आपण घरी जायचं का?"

"उगीचच कशाला तास चुकवायचे?"

"मग?"

"हा मराठीचा तास संपला की आपण वर्गात जाऊ."

"बरं दिसेल का ते?"

"न दिसायला काय झालं?"

यावर हमीद काहीं बोलला नाही.

घंटा झाली. दोघेहीजण त्यांच्या वर्गाकडे पाहू लागले.

मराठीचे गुरुजी निबंधाच्या वह्या हातात घेऊन वर्गाबाहेर पडताच श्रीकांत व हमीद त्यांच्या वर्गात शिरून त्यांच्या बाकावर जाऊन बसले.

तेव्हा शेजारच्या मुलांनी त्यांना विचारले, "डोकं दुखत होतं ना तुमचं?"

"हो. मघा दुखत होतं. पण आता बाहेरच्या मोकळ्या हवेत थोडा वेळ बसल्यावर आम्हाला बरं वाटलं." श्रीकांतने सांगितले.

"खरंच स्कॉलर आहात बाबा तुम्ही. अरे, प्रकृती

बरी नसताना देखील तुमची शाळा चुकविण्याची तयारी नाही. आश्चर्य आहे."

"उगीचच कशाला शाळा चुकवायची?"

"आणि काय रे श्री, मघा तुम्हा दोघांचं एकाच वेळी कसं काय डोकं दुखू लागलं?"

"काल आम्हा दोघांनाही रात्रीचं जागरण झालं."

"काही कार्यक्रम होता का?"

"हो."

"कसला कार्यक्रम होता?"

या प्रश्नाचे उत्तर काय द्यावे हा श्रीकांतपुढे प्रश्न पडला असता इंग्रजीचे गुरुजी वर्गात आले. प्रश्न विचारणाऱ्या मुलाने आपली नजर समोर वळविली आणि श्रीकांतने एक सुटकेचा निःश्वास सोडला.

# ६

फिरायला गेलेले श्रीकांत आणि हमीद मानाजीरावांच्या घरी आले तेव्हा थोडीशी रात्र झाली होती. त्यावेळी बाहेरचे दार बंद करून त्या दोघांचे वडील आतल्या बैठकीच्या खोलीत बोलत बसले होते. त्यांच्या खालच्या आवाजात गोष्टी चालल्या असता दाराची कडी वाजल्याने मानाजीरावांनी विचारले, "कोण आहे?"

"मी श्रीकांत."

मानाजीरावांनी उठून दार उघडल्यावर श्रीकांत आणि हमीद आत आले. तें सरळ श्रीकांतच्या खोलीकडे निघाले असता अहंमदशेठनी त्यांच्या चिरंजिवाला विचारले,

"काय रे हमीद, यावेळी तू कसा काय इथं?"

"आलो होतो एक पुस्तक घ्यायला." म्हणून सांगून हमीदने विचारले, "अब्बाजान, यावेळी तुम्ही बरं इकडं येणं केलं होतं?"

हमीदच्या प्रश्नाचा रोख अहंमदशेठांनी जाणला. त्यामुळे ते रागाने म्हणाले, "आताशी फारच चुरुचुरू बोलायला लागला आहेस बरं का तू हमीद. तुला पोराला रे कशाला हव्यात चांभार चौकशा? तू पुनः जर का माझ्या कारभारात लक्ष घातलेलं मला दिसून आलं तर मी तुझी गय करणार नाही. सांगून ठेवतो."

"भलत्या मार्गानं तुम्ही जाताहात अब्बाजान–"

"पुनः आपलं तेच!"

"मी कितीही जीव तोडून सांगितलं तरी तुम्ही तुमचं वागणं मागील अंकावरून तसंच पुढं चालू ठेवल्यावर नको का मला बोलायला?"

अहंमदशेठ आता रागाने लालीलाल झाले असता मानाजीरावांनी मध्ये पडून हमीदला सांगितले, "हमीद, तू आता जा पाहू आपल्या घरी."

"बोलू दे आबा, बोलू देत त्याला." मध्येच तोंड खुपसून श्रीकांतने सांगितले.

"आता तू उघडलंस का आपलं तोंड?"

"मी माझं तोंड उघडू नये असं जर का तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही तुमची देशद्रोही कृत्यं थांबवा."

"अरे! अरे! किती मोठ्यांदा बोलतोस तू! ऐकेल ना कुणी."

"माझं बोलणं कुणी ऐकू नये असं जर का तुम्हाला वाटत असेल तर..."

"पुन: आपलं तेच." मघा अहंमदशेठ यांनी हमीदला सांगितलं तेच मी तुला सांगतो. तू माझ्या गोष्टीत मुळीच लक्ष घालू नकोस. मला ते बिलकूल खपायचं नाही."

"पण आबा..."

"बंद कर तुझं तोंड आणि चालता हो इथून."

"माझं म्हणणं तरी पुरतं ऐकून घ्या."

"मला आता तुझं काही म्हटल्या काही ऐकायचं नाही, शहाणा म्हणताना फारच शेफारून गेला आहे लेकाचा! चल, नीघ इथून."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ५११२४ वि. आ. बा.
क्रमांक २८८३ नोंद दि. ११।१।६०

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
सा. क्र. ९५०.७२ नों. दि.
वि. बाल वा. क्र.

## ७.

शनिवार असल्याने श्रीकांत आणि हमीद यांची शाळा सकाळी होती. ती सुटल्यावर नेहमीप्रमाणे ते सरळ त्यांच्या घरी न जाता नजिकच्या बागेत जाऊन बसले. आजुबाजूला कुणी नसल्याची खात्री करून घेऊन हमीदने श्रीकांतला आठवण करून दिली, "परवा सोमवार आहे हे आहे ना तुझ्या ध्यानात?"

"त्याचा कसा मला विसर पडेल? त्या दिवशी तर आपल्या वैऱ्याच्या हातात महत्त्वाचे नकाशे आणि फितूर लोकांची यादी पडायची आहे."

"ती त्यांना मुळीच मिळता कामा नये."

"खरं आहे. त्यामुळं आपल्या देशाचं फार मोठं नुकसान होणार आहे."

"काहीही करून आपण ते होऊ देता कामा नये."

"पण ते कसं शक्य आहे? आपले वडील तर चुकीच्या मार्गानं जाणारे, त्यांची पाऊलं मुळीच मागं

घ्यायला तयार नाहीत."

"म्हणून काय आपण मूग गिळून स्वस्थ बसायचं" त्यांच्या कारवायांना पायबंद घालण्यासाठी आपण काही-तरी करायलाच पाहिजे.

"काय करणार आपण!"

"सांगू?"

"हं! सांग की!"

"आपण आपल्या वडिलांच्या कृष्णकृत्यांची पोलीस अधिकाऱ्यांना कल्पना देऊ या."

"काय! पोलीस अधिकाऱ्यांना?"

"त्यावाचून आपल्याला आता गत्यंतर नाही श्री."

"त्यामुळं होईल काय ठाऊक आहे का तुला? पोलीस आपल्या वडिलांना अटक करून नेतील...."

"त्यामुळं आपल्याला कितीही वाईट वाटलं तरी एक थोर राष्ट्रीय कर्तव्य म्हणून आपल्याला ते दिव्य करायला पाहिजे."

"ठीक आहे."

"मग चल तर. असेच जाऊन आपण डी. एस्. पीं ना भेटू या."

"यावेळी का आपण त्यांच्याकडे जायचे?"

"मग नको का जायला? आता जाऊन आपण सर्व गोष्टी त्यांच्या कानी घालू या म्हणजे त्यांना उपाय योजना लौकर करता येईल."

"बरोबर आहे तुझं म्हणणं."

दोघेही मित्र निघाले.

थोड्या वेळाने ते डी. एस्. पी. साहेबांच्या कचेरीत आले असता ते त्यांच्या हाताखालच्या लोकांशी कुठल्याशा एका गुन्ह्याच्या बाबतीत चर्चा करीत असलेले दिसले. बाहेरचा पोलीस दोघाही मुलांना घेऊन आत त्याच्याकडे आला असता त्यानी त्यांना विचारले, "काय रे मुलांनो, काय पाहिजे आहे तुम्हाला?"

"एका महत्त्वाच्या बाबीवर आम्हाला तुमच्याशी बोलायचे आहे साहेब." श्रीकांतने सांगितले.

"काय आहे ती?"

"इतरांच्या समोर सांगण्याजोगी नाही ती गोष्ट साहेब."

"इतकी का महत्त्वाची आहे ती?"

"होय साहेब, फार म्हटल्या फार महत्त्वाची आहे ती."

डी.एस्.पीं.नी एकदा विस्फारीत नेत्रांनी श्रीकांतकडे पाहिले. नंतर त्यांना काय वाटले कुणास ठाऊक! त्या दोघांना समोरच्या खुर्चीवर बसायला सांगून त्यांनी त्यांच्या कचेरीतल्या लोकांना आज्ञा केली, "ही मुले गेल्यानंतर तुम्ही इकडे या." संमतीदर्शक मान हलवून सारेजण निघून गेले असता डी.एस्.पीं.नी समोर बसलेल्या मुलांना म्हटले, "हं सांगा!"

"आपले बोलणे बाहेर कुणाला ऐकू जायचे नाही ना ?" चौफेर नजर फिरवीत श्रीकांतने विचारले.

"थांबा" म्हणून डी.एस्.पीं.नी घंटा वाजवली असता दरवाजात एक पोलीस येऊन उभा राहिला. त्याला त्यांनी हुकूम सोडला, "बाहेरच्या बाजूला तू उभा रहा आणि मी सूचना देईतोपर्यंत कुणालाही इकडे फिरकू देऊ नकोस."

"ठीक आहे साहेब."

पोलीस गेल्यावर डी.एस्.पीं. नीं श्रीकांत आणि हमीद यांना म्हटले, "आता तुम्ही तुम्हाला जे काहीं सांगायचे असेल ते अगदी निर्धास्तपणे सांगा."

श्रीकांतने त्याला सांगावयाच्या सर्व गोष्टी डी. एस्.पीं ना सांगून टाकल्या. त्यानें त्यांच्यापासून काही म्हटल्या काहीं चोरून ठेवले नाही.

डी.एस्.पी. विचारमग्न बनले. त्यांचा मुळी त्यांच्या कानावर विश्वासच बसेना. ध्यानी नाही मनी नाही अशी गोष्ट आता त्यांनी ऐकली होती. थोर देशभक्त म्हणून समजले गेलेले दोघे जुने स्वातंत्र्य सैनिक राष्ट्रद्रोही कृत्ये करीत असावेत... अभावितपणे त्यांनी श्रीकांतला विचारले, "तू सांगितलंस ते सारं खरं आहे ना ?"

"आम्ही प्रत्यक्ष आमच्या वडिलांच्याविरुद्ध तुम्हाला खोटं सांगणं शक्य आहे का साहेब ? फार काय,

ती गोष्ट तुमच्या कानी घालण्यासाठी इकडे येतेवेळी आमच्या अंत:करणाला कशी अगदी घरं पडत होती. पण एक कटुकर्तव्य म्हणून आम्ही ते केलं."

"किती थोर आहेत रे तुमची मनं ! नाहीतर तुमचे ते वडील! स्वातंत्र्य सैनिक म्हणविणाऱ्यांनी असं राष्ट्रद्रोही कृत्यं करावं...." पण लगेच स्वत:ला सावरून डी एस्. पीं. नी सांगितले, "राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनं फार मोठी कामगिरी बजावली आहे तुम्ही. तेव्हा आता जा तुम्ही आणि तुम्हाला काही नवीन कळलं तर मला कळवायला विसरू नका."

"छे! छे! आम्ही कसं ते विसरू!" म्हणून श्रीकांतने सांगितले, " ते पाकिस्तानी गुप्तहेर आमच्याकडं परवाच्या दिवशी रात्री येणार असल्याचं तुमच्या नीट ध्यानात राहू देत साहेब."

त्याचा मला विसर पडणं कधी तरी शक्य आहे का रे.

"मग ठीक आहे."

"तुमच्या माहितीसाठी एक गोष्ट मी तुम्हाला सांगून ठेवतो. साध्या पोशाखातील माझे लोक आजपासूनच तुमच्या घरावर नजर ठेवून असतील. पण आम्ही तुमच्या घरावर छापा घालू तो सोमवारी रात्री, त्या पाहुण्यांना घेऊन तुमचे वडील माडीवर गेल्यावर "

श्रीकांत आणि हमीद मोठ्या समाधानानें तेथून बाहेर पडले.

# ८

सकाळी चहाबरोबर भरपेट नाश्ता झाल्यावर मानाजीराव स्वयंपाकघरातून बाहेर पडले. बैठकीच्या खोलीत येऊन ते निवांतपणे वर्तमानपत्र वाचीत बसले असता त्यांच्या सौभाग्यवतीने त्यांच्याजवळ येऊन विचारले, "आज रविवार आहे. घरसामानाची यादी द्यायला सांगितली होती ना तुम्ही ?"

"केली आहेस का ती ?"

"हो."

"मग दे की. दुपारी आपण गावात जाऊन सारं सामान घेऊन येऊ."

सौभाग्यवतीचा चेहरा फुलला. तिने आपल्या हातातील यादी पतिराजांना दिली असता त्यावरून नजर फिरवून ते म्हणाले, "यात तुला आणि मुलांना घ्यावयाच्या कपड्यांचा कुठं समावेश केला नाहीस ते ?"

"कपडेही घ्यायचेत का आज ?"

"मग ? अग, एकदम सारं काही घेऊन टाकू."

"ठीक आहे."

श्रीकांतच्या आईने मानाजीरावांच्या हातातून यादी घेतली आणि तेथल्या तेथे त्यात बारा वस्तूंचा समावेश करून ती परत केली. नंतरच्या कलमावरून नजर फिरवून झाल्यावर मानाजीरावांनी पत्नीला विचारले, "आपल्याला, आपल्या थोरल्या चिरंजिवांचा अगदीच विसर पडल्यासारखा दिसतो आहे बाईसाहेब."

"कशावरून म्हणता तुम्ही हे?"

"या यादीत श्रीसाठी एकही वस्तू नाही त्यावरून. त्याला काही नको आहे का?"

परवाच्या त्या प्रकरणापासून तो थोडासा फुगल्यासारखाच आहे. त्याला काही हवं का म्हणून विचारलं तरी तो काही सांगत नाही."

"भारी भावनाप्रधान आहे पोरगा. पन्नास वर्षांपूर्वी मीही भडक माथ्याचाच होतो. मला आपल्या भारतमातेशिवाय काही सुचत नव्हतं की रुचत नव्हतं. ती कधी स्वतंत्र होते याचा मला ध्यास लागला होता. त्यासाठी मी सर्वस्वाला मुकलो. सारं आयुष्य हालअपेष्टात घालविलं. नंतर झालं तरी मी तसंच दारिद्र्याचं जिणं जगत राहिलो असतो पण अहंमदशेठ यांनी माझं डोकं ताळ्यावर आणलं. आता कुठं आपल्याला चांगले दिवस लाभले असता या पोराला भिकेचे डोहाळे आठवताहेत. त्याला

त्याचे बरे-वाईट समजत नाही. मी त्याला समजावून सांगू लागलो तरी तो ऐकत नाही."

"त्याच्या वागण्याकडे मुळीच लक्ष देऊ नका तुम्ही. काही दिवसांनी जाईल त्याच्या डोक्यातले वेड."

"ठीक आहे." म्हणून मानाजीरावांनी विचारले, "त्याला काय हवं ते ठाऊक नाही का तुला?"

"मला वाटतं त्याला स्वेटर हवा आहे. त्याचा स्वेटर अगदीच फाटला आहे."

"मग त्याच्यासाठी आपण एक झकासपैकी स्वेटर खरेदी करू. तो पाहताक्षणीच आनंदानं उड्या मारायला लागला पाहिजे."

"मग यादीत लिहा ते."

"तूच लिही."

श्रीकांतच्या आईने सामानाच्या यादीत श्रीसाठी स्वेटर हे शेवटचे कलम लिहून ती मानाजीरावांना परत केली. त्यांनी ती आपल्या शर्टाच्या खिशात ठेवून दिली. ठरल्याप्रमाणे मानाजीराव दुपारी चार वाजता पत्नीसह बाजारात गेले. ते यादीप्रमाणे सर्व माल खरेदी करून सूर्यास्ताच्या वेळी परतले.

मुले त्यांचीच वाट पहात होती. त्यांचे आईवडील खरेदी केलेले सारे सामान घेऊन घरात आले असता ते त्यांच्याभोवती जमले. त्यांच्यासाठी आणलेल्या वस्तू त्यांच्या हाती पडताच तर ती आनंदाने उड्या मारू

लागली.

एकटा श्रीकांत काय तो त्याचा स्वेटर घ्यायला त्याच्या मातापित्यांच्याजवळ आला नाही. तो घरी होता तरी तो त्याच्या खोलीत बसून राहिला होता. तो अभ्यास करीत होता असे म्हणावे तर तेही नाही. बिछान्यावर पडल्या पडल्या विचार, एकसारखा विचार करीत होता तो.

अशातच त्याला वडिलांची हाक ऐकू आली, "श्री, अरे श्री..." श्रीकांतने हाक ऐकली. पण त्याने काही ओ दिली नाही. मग उठून बाहेर जाण्याची गोष्ट तर दूरच राहिली.

मानाजीरावांनी जास्त मोठ्यांदा हाक मारली, "श्री, इकडे येतोस का तू?"

आता मात्र तसेच पडून रहाणे श्रीकांतला बरे वाटले नाही. म्हणून उठून तो बाहेर आला असता हातातला सुरेख असा स्वेटर त्याच्यापुढे नाचवीत त्यांनी म्हटले, "तुझ्यासाठी आणला आहे हा आम्ही. याला चांगले छपन्न रुपये पडले..."

"काय? छपन्न रुपये?"

"मग? असला स्वेटर त्याहून कमी किमतीत थोडाच मिळणार आहे?"

"पण मी म्हणतो, एवढा भारी किमतीचा स्वेटर तुम्ही आणलातच मुळी कशाला?"

"कशाला म्हणजे? आता काय म्हणावं या पोराला? अरे, तुझी स्वेटरची हौस आम्ही भागवायची नाही तर कुणी? घे हा."

"हरामाच्या पैशावर घेतलेला स्वेटर मला मुळीच नको आहे आबा." एवढें बोलून श्रीकांत तेथून निघून गेला.

त्याच्या वडिलांचा चेहरा नुसता पडलाच नाही तर त्यांच्या डोळ्यात अंगाराने प्रवेश केला. त्यांच्या हाताच्या मुठी वळून दात खात ते पुटपुटले, "फारच भडक...डोक्याचा आहे लेकाचा!"

"जाऊ दे. डोकं थंड झाल्यावर आपण होऊन घेऊन जाईल तो स्वेटर." श्रीकांतच्या आईने पतिदेवांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

पण या बोलण्याने मानाजीरावांचा गेलेला आनंद काही परत मिळाला नाही. तो जायचा तो जाऊन त्यांना अतिशय विषण्ण बनवून गेला. अशातच थोरल्या वृंदाने रेडिओ लावला असता ते रागाने ओरडले, "आम्ही इथं बोलत बसलो असता तुला रेडिओ लावायचं सुचतं ना वृंदा?"

"आता एक सुंदर कार्यक्रम असल्यानं तुम्हाला देखील तो ऐकणं आवडेल आबा."

"असा आहे तरी काय तो कार्यक्रम?"

"इतिहास प्रसिद्ध पन्नादाईवर एक श्रुतिका आहे."

"देशासाठी पोटच्या पोराचा बळी देणाऱ्या त्या

रजपूत रमणीची कथा आपल्याला या दिवसात ऐकविली जावी हे आश्चर्य आहे. जमाना बदलला असल्याची साधी गोष्ट देखील कळत नाही आमच्या इथल्या आकाश-वाणीच्या कार्यक्रम संयोजकांना. आजची स्त्री देशासाठी मुलाचा बळी द्यायचं तर दूरच राहिलं पण मुलासाठी देशाशी बेईमान व्हायला मागंपुढं पहाणार नाही."

"थांबा आबा, कार्यक्रम सुरू झाला."

मानाजीरावांनी आपले बोलणे थांबवले आणि पलीकडे पडलेले वर्तमानपत्र उचलले. रेडिओवर श्रुतिका सुरू झाली.

सर्वजण ती लक्षपूर्वक ऐकत होते. एकटे मानाजी-राव मात्र वर्तमानपत्रात तोंड खुपसून बसले होते.

कार्यक्रम संपल्यावर मुले समाधानाने उद्‌गारली, "छान होती श्रुतिका"

यावर मानाजीराव काही बोलले नाहीत. ते आपले तसेच वर्तमानपत्र वाचीत राहिले. आणि श्रीकांत, मघाचे पन्नादाईच्या श्रुतिके– विषयीचे त्याच्या वडिलांचे उद्‌गार आणि त्यानंतरची रेडिओवरील श्रुतिका त्यानें ऐकलेली असल्याने आधीच गंभीर बनलेला तो जास्तच गंभीर झाला.

नंतर तो विचार करू लागला. विचार करकरून वेडे होण्याची पाळी त्याच्यावर आली. त्याच्या धाकट्या भावानें त्याला बोलावून स्वयंपाक घरात नेल्यावर त्याने जेवण केले; नव्हे कसेबसे चार घास पोटात ढकलून पुनः

तो आपल्या खोलीत येऊन विचारमग्न बनला.

तो तसाच विचार करीत कितीवेळ बसून राहिला असता कुणाला ठाऊक! रात्रीचे बारा वाजले असता त्याच्या आईने त्याला हाक मारली, "श्री!"

"काय आई?" झोपेतून जागे झाल्याप्रमाणे चमकून उठून श्रीकांतने विचारले.

"बारा वाजले तरी अजून कसा झोपला नाहीस तू? इतका वेळ अभ्यास केल्यानं प्रकृती नाही का बिघडायची."तेव्हा पुस्तक खाली ठेवून झोप पाहू तू आता."

श्रीकांतच्या हातात पुस्तकच नव्हते. तेव्हा ते खाली ठेवायचा मुळी प्रश्नच नव्हता. त्याने दिवा मात्र लगेच विझविला. पण त्याच्या आईच्या सूचनेप्रमाणे तो लगेच झोपी मात्र गेला नाही. तो डोळे मिटून बिछान्यावर पडला तरी निद्रादेवी त्याच्यावर प्रसन्न झाली नाही. सारी रात्र त्याने झोपेविना तळमळत घालविली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय
अनुक्रम ९९१२५ दि.
क्रमांक ३८६३ नोंद दि. ११।११।६३

# ९

शेवटी उगवला एकदाचा सोमवारचा दिवस.

श्रीकांत नेहमीप्रमाणे हमीदबरोबर शाळेला गेला. पण त्याचे काही अभ्यासाकडे लक्ष लागेना. इतिहासाचे गुरुजी काही शिवकालीन समर प्रसंग रसभरीतपणे सांगत होते. पण त्या दोघांचे तिकडे लक्ष असेल तर शपथ! दोघांची नजर गुरुजींच्याकडे होती तरी त्यांच्या मस्तकात मारे वेगळेच विचार घोळत होते. मध्यरात्री त्यांच्या घरी घडणार असलेल्या भयंकर घटनांनी त्यांच्या मस्तकात थैमान घालून त्यांना कसे अगदी बेजार करून सोडले होते.

शाळा सुटल्यावर ते वर्गाबाहेर पडले तरी सरळ घरी न जाता थोड्या अंतरावर असलेल्या पुलावर जाऊन बसले. एकदा चोहोबाजूला बारीक नजरेने पाहून हमीदने श्रीकांतला खालच्या आवाजात सांगितले, "माझ्या वडिलांची यादी तयार झाली आहे."

"पाहिलीस का तू ती ?"

"होय तर. सकाळी अब्बाजान बाहेर गेले असता मी त्यांच्या लिहिण्याच्या टेबलाचा खण उघडला. तेव्हा मला खालच्या बाजूला ठेवलेली हरामखोर लोकांची यादी आढळली."

"अस्सं !"

"आणि काय रे, तुझ्या वडिलांनी नकाशे आणून ठेवले आहेत का?"

"त्यांनी ते शनिवारी रात्रीच आणून ठेवले आहेत. काल दुपारी ते आईबरोबर बाजारात गेले असता त्यांचे कपाट उघडून पाहिले आहे मी. चांगले चौदा नकाशे मिळविले आहेत त्यांनी."

यावरून आपले वडील कबूल केल्याप्रमाणे वैऱ्यांना आज रात्री साहित्य पुरविणार !

"हो. अगदी नक्की."

त्यांचे भाकीत खरे ठरले. रात्रीचे बारा वाजले असता अहंमदशेठ पाकिस्तानी गुप्तहेरांना घेऊन मानाजी-रावांच्याकडे आले. चोहीकडे नजर फिरवून कोणाचेही त्यांच्याकडे लक्ष नसल्याची खात्री झाल्यावर ते चटकन् जिना चढू लागले. सर्वात मागे राहिलेल्या मानाजीरावांनी जिन्याचे दार चटकन् आतून बंद करून घेतले. आणि हळुहळू पाऊले टाकीत ते जिना चढून वर गेले.

श्रीकांत त्याचीच वाट पहात होता. त्याने जिन्या-

च्या दाराची कडी काढली. आणि लगेच फिरून तो त्यांच्या खोलीत जाऊन खिडकीजवळ उभा राहिला.

त्याचे सारे लक्ष समोरच्या उघडचा खिडकीतून बाहेर होते.

त्याचा श्वास जोराने वहात होता तर त्याच्या हातापायांची चुळबूळ सारखी सुरू होती. पण अशा स्थितीत त्याला काही फार वेळ घालवावा लागला नाही. थोडचावेळानेच सशस्त्र पोलिसांचा ताफा तिकडे धावून आला. आणि त्यांनी मानाजीरावांच्या घराला चोहोबाजूंनी गराडा घातला. डी.एस्.पी. लगेच आपल्या निवडक सहकाऱ्यांसह जिन्याकडे वळले. ते चोर पावलांनी जिना चढून वर गेले असता पाकिस्तानी पाहुणे मानाजीराव आणि अहंमहशेठ यांनी दिलेल्या महत्त्वाच्या कागदपत्रांवरून नजर फिरवीत होते. फारच प्रसन्न दिसत होते ते !

डी.एस्.पी. दारात येताच हातातले रिव्हॉल्व्हर आतल्या मंडळींच्यावर रोखून ते हुकमी आवाजात म्हणाले, "स्वस्थ बसून रहा तुम्ही. थोडीशी जरी हालचाल केलीत तरी तुमचा मुडदा पडला म्हणून समजा."

मानाजीराव आणि अहंमदशेठ यांनी चमकून आवाज आलेल्या दिशेला पाहिले. त्यांच्यावर रिव्हॉल्व्हर रोखून डी.एस्.पी. त्यांच्या सहकाऱ्यांसह दरवाजात उभे असलेले दिसताच त्यांची पाचावर धारण बसली.

आणि ते पाकिस्तानी गुप्तहेर ? तेथे पोलीस आलेले

पाहून खिशातले पिस्तूल काढण्यासाठी त्यांनी आपले हात तिकडे नेले असता त्यांच्यावर लक्ष असलेल्या डी.-एस्.पीं. नी स्वर चढवून म्हटले, 'खबरदार तुम्ही खिशाकडे हात न्याल तर. तुम्ही थोडीशी जरी हालचाल केलीत तरी आमच्या रिव्हॉल्व्हरमधल्या गोळ्या तुमच्या छातीत शिरल्याच म्हणून समजा."

या दरडावण्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. त्या दोघांनी खिशाकडे नेलेले हात लगेच मागे घेतले. तेव्हा डी.एस्.पी. लगेच कडाडले, "सर्वजण आपले हात वर करा. सर्वांनी मुकाट्याने आपले हात वर केले. तेव्हा डी.एस्.पीं. नी त्यांच्या बरोबरीच्या पोलिसांना इशारा दिला असता ते चटकन् पुढे झाले. त्यांनी त्या चौघांच्याही हातात बेड्या ठोकल्या.

नंतर त्यांनी त्यांची कसून झडती घेऊन त्यांच्या जवळचे सारे कागदपत्र तर हस्तगत केलेच पण त्या पाकिस्तानी हेरांजवळची पिस्तुले आणि नोटांची पुडकीही मिळविली. त्यानंतर त्यांना पुढे घालून ते खाली आले.

आता अहंमदशेठ यांची बेगम तेथे येऊन ढसढसा रडू लागली होती. मानाजीरावांची पत्नी तर बैठकीच्या खोलीत बसून मुक्तकंठाने अश्रू ढाळीत होती. आपल्या उचंबळून येणाऱ्या भावना आतल्या आत दाबण्याचा प्रयत्न करीत श्रीकांत घराबाहेर आला. त्याला हमीद येऊन मिळाला. दोघेही जिन्याच्या दाराजवळ उभे राहिले.

समोरच्या बाजूला पोलिसांच्या काळ्या गाड्या उ
होत्या. त्यांच्यात पकडलेल्या लोकांना पोलिसांनी बसवि
नंतर तेही आत शिरून त्यांनी मागच्या बाजूची दारे
करून घेतली.

डी. एस्. पीं नी एकदा श्रीकांत आणि हमी
कडे अर्थपूर्ण नजरेने पाहिले. न बोलता त्या
आभार मानले. आणि ते लगेच आपल्या गाडीतून
गेले.

जाणाऱ्या गाड्यांच्याकडे स्थिर नजरेने
असता श्रीकांतचे डोळे अश्रुंनी डबडबले. तेव्हा थो
विस्मयानेच हमीदने त्याला विचारले, "श्री,
डोळ्यात अश्रू?"

"आपण आपलं राष्ट्राविषयीचं कर्तव्य के
समाधान मनाला वाटत असलं तरी आपल्या वडि
अशारीतीने गिरफदार व्हावं लागलेलं पाहून वाईट व
ल्यावाचून कसं राहील?"

म. ग्रं.
क्र. ९५०७९ नों. दि
दि.

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 6112
IRBK-0115979
क्रमांक 3662 नोंद दि.